॥ श्री ॥

# ॥ पार्वतीविलासम् ॥

शशांकशेखरोज्ज्वलस्मितांशुमालिकालसद्
विनोदमोदसिन्धुमज्जनोत्सुकापराजिता ।
मदालसाङ्गभङ्गिमाङ्गनाविलासदेशिका
महेशमोहिनी महेश्वरी जयेदमंगलम् ॥१॥

शशांकशेखर अशा भगवान शंकराच्या उज्ज्वल स्मितहास्याच्या किरणांच्या माळेमध्ये शोभून दिसणाऱ्या विनोदातून जो मोदरूपी सागर उचंबळतो आहे त्यात विहार करण्यासाठी उत्सुक असणारी पार्वती, मदामुळे आळसावलेल्या गात्रांना भंगिमा करताना सुंदर स्त्रियांना अंगविलासाचे तंत्र समजावून सांगणारी जी अपराजिता महेशाला देखील मोहित करणारी पार्वती आमच्या अमंगलाचा नाश करो.

लसत्कुलाटिकाविलोलमौक्तिकालिशोभना
लयोल्लिलालितांगहारमालिकामनोहरा ।
दिगिन्नगिन्धिगिन्नगिन्धिगिन्नगिन्निति ध्वन-
मृदंगसंगिनी तनोतु पार्वती सदाशिवम् ॥२॥

कपाळावर झुलणाऱ्या बिंदीमधील शोभिवंत मोती झालरीप्रमाणे डुलत आहेत. लयतालाच्या तरंगातून साधले जाणार तिच्या मोहक हालचाली, (अंगविभ्रम) च्या माध्यमातून मृदंगाच्या दिगिन-नागिन, दिगिन-नागिन, धिगिन नागिन अशा प्रकारच्या ध्वनिलहरींना साथ करणारी पार्वती आमच्या कल्याणाचा नेहमी विस्तार करो.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |
| M | T | W | T | F | S | S |

DECEMBER '14

© www.madhuraveeraghuveer.com

हिरण्मयालसत्किरीटिनी सुवर्णवर्णिनी
मणिप्रभामयूखजाललालितांगदीपिनी।
चलत्कटिस्थकाञ्चिदामिनीद्युतिविवर्धिनी
सुहासिनी गिरीशनन्दिनी करोतु मंगलम् ॥३॥

सळाळणाऱ्या सुवर्णाचा मुकुट धारण करणारी, स्वतः सुवर्णमय कांति असणारी, जिने धारण केलेल्या अलंकारातील रत्नांच्या तेजाच्या किरणांनी शोभून दिसणाऱ्या अवयवांमुळे अत्यंत सतेज, चारुगात्री, सुहास्यवदना अशी जी हिमालय कन्या पार्वती आमचे मंगल करो.

अनंगसंगिनीमनस्तरंगभंगिनिन्दिता।
इंगहारकल्पनाकलाकलापकौशलान्विता।
झनुन्झुनुन्झु नुन्झुनुन्न नुन्झनुन्निनादिनी
शिवा त्रिमुक्ततांडवं शिवश्चिराय पश्यतु ॥४॥

अनंगसंगिनी (मदनाची पत्नी रती)च्या मनातील लहरींना भंग करणाऱ्या विभ्रमांच्या कल्पनारूपी कलासमूहाचा आविष्कार करण्यात कुशल असणारी आणि आपल्या पैंजणातून झण झुण झण झुण असा मंजुळ निनाद करणारी पार्वती त्या भगवान शंकरांकडे चिरकाळ पहात राहो. त्या शंकरांनी पार्वतीचे हे नृत्य पाहून तांडव करणे सोडून दिले आहे.

सितस्मिताधरप्रवालनिन्दितेन्दुलेखया।
विमुक्तवेणिसर्पिणीहृताहिमण्डलश्रिया।
शुभाङ्गभङ्गिनिर्जितोजरङ्गनाङ्गलावण्या।
प्रसाध्यतामहर्निशं शिवः प्रसन्नयोमया ॥५॥

आपल्या निर्मळ स्वच्छ स्मितहास्यांनी युक्त असलेल्या ओठांच्या महिमेने जिने चंद्राच्या कलेलाही लाजवले आहे. तसेच प्रकाराने मोकळ्या सोडलेल्या वेणीरूपी सर्पिणीमुळे

© www.madhaveeraghuveer.com

शिवाने धारण केलेल्या नागमण्डलाला देखील लज्जित केले आहे. तिच्या शुभ चिन्हांकित अशा अंगप्रत्यंगामधून कमनीयता शोभून दिसते आहे. ज्याद्वारे उसळणाऱ्या लहरींनी युक्त अशी गंगेची शोभा देखील तिच्यापुढे फिकी पडली आहे अशी ही प्रसन्न उमा भगवान शंकरांना नित्य प्रसन्न करो.

चलत्पदाम्बुजार्पितैरलक्तकाङ्कितैः पराम्
प्रफुल्लपङ्कजच्छविं समर्प्य यत्प्रभम्।
हिमावृतावनीतलङ्कटिस्थकिङ्किणीक्वणन
प्रवीणया विनोद्यतामभन्दमिन्दुशेखरः ॥६॥

नृत्य करत असता तिच्या कमळासारख्या नाजूक पावलांना आळता लावल्यामुळे हिमप्रदेशावर जी चिन्हे उमटली आहेत. ती म्हणजे जणू काही हिमाच्छादित प्रदेशाला तिने उत्फुल्ल अशा कमळांची कांति बहाल केल्याप्रमाणे भासत आहे. तिच्या कमरेवर असणाऱ्या कमरपट्ट्यातील लहान लहान घुंगरे किण किण असा मंजुळ ध्वनि करून आकर्षित करत आहेत. अशी कलाप्रवीण पार्वती प्रगाढ रुपाने चंद्रमौळी शंकराचे मनोरंजन करो.

महेशमौलिमल्लिकामिलन्मिलिन्दगुञ्जितं
प्रकल्प्य मध्यमस्वरं सुमध्यमाभिरंशकम्।
प्रगीयमानमालिभिः प्रबन्धमङ्गभङ्गिभिः
धिनोतु शैलजामनोजवैरिणोऽनिशम्मुदे ॥८॥

भगवान शंकरांच्या मस्तकावर शोभून दिसणाऱ्या मोगऱ्याच्या फुलांच्या भोवती गुंजारव करणाऱ्या भुंग्यांच्या ध्वनिला अंश (प्रधान) मध्यम स्वर मानून आणि आपल्या सख्यांसमवेत उत्तम रीतीने गायल्या जाणाऱ्या संगीताला प्रबंध मानून ही पार्वती देवी जी शैलपुत्री आहे ती आपल्या अंगांगातून

© www.madhaveeradhuveer.com

कामदेवाचा शत्रु असणाऱ्या शंकराच्या प्रसन्नतेसाठी नित्य रत राहो.

अपङ्गभाङ्गिभङ्गिताभिषङ्ग हर्षितो हरः
पदारविन्दनूपुरक्वणेन मन्दहासया।
सलीलमालिवृन्दवन्दनोल्लसद्विलासया
निमन्त्र्यतामनङ्गगर्वभञ्जको ऽनुकूलये॥८॥

अंग प्रत्यंगाच्या भंगिमेमधून सूचक संकेत करत, हलक्याशा स्पर्शाने रोमांच उभे करणारी अशी पार्वती मदनाचा गर्व हरण करणाऱ्या शंकराला मंद सुस्मित करत, आपल्या चरणकमलामध्ये बांधलेल्या नुपुरांच्या हलकेच ध्वनि करत, आकर्षित करणाऱ्या मुद्रेने निमंत्रण देत आहे. आपल्या सख्यांच्या समुदायाकडून पार्वतीची प्रशंसा केली गेल्याने जिच्या विलासाला एक वेगळ्याच प्रकारचा उल्लास प्राप्त झाला आहे.

पुरा विशालबाहुदण्डमण्डनैर्भुजङ्गमैः
मृदङ्गवेणुवल्लकीनिनादमोहितैस्ततः।
श्लथाङ्गबन्धनच्युतैश्चञ्चलैश्शनैश्शनैः
सरन्ध्रमिरन्तरान्तरा विरम्यतामितस्ततः॥९॥

पूर्वी जे सर्प भगवान शंकरांच्या बाहुदंडावर शोभून दिसत होते, अलंकाराप्रमाणे विराजमान असणारे ते सर्प आता मात्र मृदंग, वेणु आणि वीणावादनाचे सूर ऐकून मोहित झाले आहेत. पूर्वी फूत्कार टाकणारे ते सर्प त्यांच्या देहाचे बंध शिथिल झाल्यामुळे त्यांच्या स्थानावरून ढळले आहेत-गळून पडले आहेत. त्यांची सळसळ करणारी चंचलता आता त्यांनी सोडून दिली आहे. आणि ते हळूहळू थांबत थांबत सरकत आहेत आणि विश्रांति घेत आहेत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 3 | 4 | OCTOBER '14 |
| | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | |
| | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |
| S | M | T | W | T | F | S | |

© www.madhaveeraghuveer.com

। मदोल्लसन्महेशमानसोर्मिजालमीलितम्
महानलस्फुलिङ्गवर्जितोल्ललाटलोचनम् ।
जटाभुजङ्गराजये शिरस्थजह्नुसूनवे
निरन्तरं सुखावहं सखीजनाय जायताम् ॥१०॥

मदामुळे उल्लसित होऊन भगवान शंकरांच्या मनात ज्या ऊर्मि उठत आहेत त्यांच्या जाळ्यामुळे मिटलेल्या आणि प्रचंड अग्निच्या स्फुलिंगविरहित असणारा त्याचा तिसरा डोळा, ज्याने जटा बांधल्या आहेत अशा भुजंगमाला आणि मस्तकावर असणारी गंगा ही सर्व, नृत्य करणाऱ्या पार्वतीला व तिच्या सख्यांना नित्य सुखदायी होवो.

उमापदक्रमोल्लसमना मनागधीश्वरी
हिलन्स्फुरस्थलन्मिलन्हसन्ध्वनन्समनात: ।
सखीजनोपवीणितो विनोदभाजनं शिवो
हिमाद्रिजामृणालबाहुवेष्टितो विलोक्यताम् ।

भगवती पार्वतीच्या पदन्यासाच्या गतिमुळे जे उल्लसित, कंपित, रोमांचित झाले आहेत (अशी नुपूरे किंवा कुंडले) पुन्हा तिच्या नृत्यामध्ये सहभागी होऊन हसतमुखाने, हर्षोद्गाराने जे शंकराच्या दृष्टीचा विषय झाली आहेत. त्या शंकरांनी आपल्या बाहूंनी पार्वतीला जवळ ओढून घेतले आहे. आणि तिच्या सख्या चेष्टामस्करी करत वीणा वाजवून मनोरंजन करत आहेत.

हिलत्सुवर्णकुण्डलोल्लसत्कपोलदर्पणा
लुठत्किलोलमौक्तिकावलीलसत्पयोधरा ।
झनन्झनन्झनन्झनन्झनेति कास्यतालक
स्वनानुवर्तिनी गिरीन्द्रजाश्रयेत्फणीन्द्रिणम् ॥

हलणाऱ्या, डुलणाऱ्या सुवर्णकुंडलांमुळे जिचे आरशासारखे (Glowing) चमकदार गाल उल्लसित होत आहेत. वक्षस्थलावरील मोत्यांच्या माळांमुळे उरोज शोभून दिसत आहेत. कांस्यांच्या झनन झनन ध्वनिला अनुसरून जी पावले नर्तन करत आहेत. अशी पार्वती शंकरांचा आश्रय करो

DECEMBER '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |
| M | T | W | T | F | S | S |

© www.madhaveeraghuveer.com